आर.सी.सी क्र. ५८८/२०१३

सरकार विरुध्द शेख जिलानी

**निशाणी क्र. ३१/क**

**अभियोग पक्षा तर्फे साक्षीदार क्रमांक २ यांची जबानी–**

मी प्रतिज्ञापुर्वक शपथेवर निवेदन करतो की,

**माझे नाव – श्री. प्रकाश बंडु काळे,**

वय – ५९ वर्षे, व्यवसाय – सेवानिवृत्त ए.एस.आय.

निवासस्थान– पडेगाव, औरंगाबाद.

---

**सरतपासणी अभियोग पक्षा करीता**

**श्री. ए. झेड. काझी, सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचे तर्फे –**

१. सन २०१२ साली माझी गुन्हे शाखा, पोलीस आयुक्तालय, औरंगाबाद येथे कॉन्स्टेबल या पदावर मी कार्यरत होतो. मी दिनांक १५.०८.२०१२ रोजी कर्तव्यावर हजर असतांना पोलीस उप निरीक्षक श्री. खटावकर यांनी गुन्हा नोंद क्र १७४/२०१२, पोलीस ठाणे छावणी, औरंगाबाद कलम ३७९ भा.द.वि यांनी मला त्यांचे सोबत आरोपी अटके बाबत पंचनाम्यासाठी चलायला सांगीतले. त्यानंतर मी, श्री. खटावकर यांच्यासोबत व दोन पंच, पोलीस कॉन्स्टेबल श्री. बोडखे असे कटकट गेट औरंगाबाद येथे आरोपी शेख जिलानी याच्या घरी गेलो. तेथे गेल्यानंतर आरोपीची पत्नीने पलंगाखालून चंदनाच्या लाकडीची पिशवी काढून दिली. सदर मुद्देमाल श्री. खटावकर यांनी पंचासमक्ष जप्त केले व जप्ती पंचनामा त्यांनी तयार केला. त्यानंतर श्री. खटावकर यांनी माझे सदर प्रकरणात जबाब नोंदविला. आरोपी शेख जिलानी आज कोर्टात आहे.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपासणी आरोपी पक्ष क्र.१,२ करीता श्री. पी. एम. बेद्रे, विधीज्ञ यांचे द्वारा–</u>**

२. कटकट गेट येथील आरोपी शेख जिलानी याचा घर क्रमांक मला सांगता येत नाही. तसेच मला त्या घराच्या चतुःसिमा सांगता येत नाही. श्री. दुबे साहेबांनी मला कोणतीही नोटीस दिली नाही. पंचाची नावे मला सांगता येत नाहीत. हे म्हणने खरे आहे की, आमच्या सोबत

**निशाणी क्र. ३१/क**

वनविभागाचे कोणतेही कर्मचारी नव्हते. हे म्हणने खरे नाही की, श्री. खटावकर यांनी मला बोलविले नाही व मी त्यांचे सोबत आरोपी शेख जिलाने याचे घरी गेलो नाही. हे म्हणने खरे नाही की, माझ्या समक्ष आरोपीच्या घरून त्याच्या पत्नीने चंदनाचे लाकडाची पिशवी काढून दिली नाही. हे म्हणने आहे की, आजच्या आधी आरोपींना बघण्याच्या कोणताही प्रसंगत मला आला नाही. हे म्हणने खरे नाही की, श्री. खटावकर साहेब यांच्या सांगण्यावरून मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेर तपास काही नाही.**

| | |
|---|---|
| समक्ष | श्रवणोत्तर स्वीकृती. |
| **–/स्वाक्षरीत/–** | **–/स्वाक्षरीत/–** |
| ( श्रीमती ए.डी. बोस ) | ( श्रीमती ए.डी. बोस ) |
| मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद | मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद |

**दिनांक– ०३/१०/२०२४**